Chaturth Pushpa Jivandarshan 2019



# फुले-आंबेडकर हे विश्वविख्यात पहिले ऑरगॅनिक इंटेलेक्च्युल होते.

- डॉ. श्रीकांत काळोखे

फुले-आंबेडकर हे विश्वविख्यात पहिले ऑरगॅनिक इंटेलेक्च्युल होते. त्यांच्या अथक प्रयासातून निर्माण झालेल्या वैश्विक बहुजनांच्या उद्धाराचे शिक्षण रोपटे सांभाळणे ही काळाची गरज असल्याचे भावोद्गार रसायनशास्त्राचे प्राध्यापक, मार्क्सवादी, विचारवंत डॉ. श्रीकांत काळोखे यांनी व्यक्त केले. डॉ.आंबेडकर महाविद्यालयात सम्यक जीवन दर्शनाचे चतुर्थ पुष्प आज पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी गुरव होते.

१२८ व्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिवशी पार पडलेल्या या चतुर्थ पुष्पप्रसंगी 'फुले-आंबेडकरांच्या शैक्षणिक दृष्टिकोन आणि शैक्षणिक आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. श्रीकांत काळोखे यांनी प्रगत देशातील विज्ञान, तंत्राानाच्या साधनांच्या निकषावरुन देशाची उन्नती ठरत नाही तर त्या देशातील बहुजन, युवा पीढी कशा प्रकार घडत आहे, यावरुन देश विकास ठरतो. आज रोजी शिक्षणाची केंद्रे ही झेरॉक्स मशीन झाली आहेत. ज्यामधून केवळ पदवीधारक बाहेर पडत असून गुणात्मकता ढासळली आहे. याबाबत खंत व्यक्त केली. फुले-आंबेडकर या दोघांमधील साधर्म्य साधणारा घटक म्हणजे शिक्षण असून तो केवळ उदरनिर्वाहाचे माध्यम होता कामा नये, हे ही फुले-आंबेडकरांची विशालता स्पष्ट करीत स्वावलंबी, आत्मसम्मान जागवणारी अंगे आहेत. याबाबत उहापोह केला. अमेरिकन शिक्षणतज्ञ मायकेल ॲपीइल यांचा दाखला देत त्यांनी शिक्षण म्हणजे पाळीव संस्कार करणारी संस्कार असून यामधून पारंपारिक व्यवसायाचे मार्जन केले गेले पाहिजे हे सांगितले. शुद्ध भाषेपोटी ग्रामीण, वंचित लोकांच्या मुखातून बाहेर पडणारे शब्द कालबाह्य होत आहेत. याचे उपरोधिक शैलीत स्पष्टीकरण देत आजकालची मूठभर लोकांच्या मुलांना पोसणारी, मेरीटच्या नावाखाली चालणारी शिक्षणकेंद्रे ही फुले-आंबेडकरांच्या शिक्षणाच्या वारसदारांची गळचेपी करीत आहेत. हे मांडत सैराट, फॅंड्री सारख्या चित्रपटातील मागास लोकांच्या अवहेलनेची उदाहरणे सांगत आज आपण सर्वांनी फुले, आंबेडकरांच्या शोषितातून शोषकता जागृत करणारी, आत्मसन्मानी बनविणाऱ्या शिक्षण व्यवस्थेचा पुरस्कार केला पाहिजे, असे आवाहन केले. जगातील प्रगत

लोकांचे रहस्य त्यांच्या शिक्षणात आहे हे महामानव बाबासाहेबांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी गुरु फुलेकडून घेतलेल्या शिक्षणबाळकडूचे वैश्विकीकरण केले, त्याला जपणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. सरकारचा 'राईट टू एज्युकेशन' हा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क तर अल्पसंख्यांक, वंचितांना तुम्ही वंचित आहात वेगळे आहात ही जाणीव निर्माण करणारा असून तो जनमाणसांना विभाजित करणारा आहे. म्हणूनच आज मातृभाषेतूनच सर्वांना शिक्षण दिले गेले व कोचिंग क्लासेसवाल्यांची दूकानदारी बंद झाली तरच उन्नत भारताची कवाडे खुलतील असा आशावाद व्यक्त करीत भारतासारख्या लोकसंख्येच्या बाबतील जगात अग्रेसर असणाऱ्या देशात जनसंख्येनुसार संशोधने घडावित असा आवाहन वि.ना. त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ.धनाजी गुरव यांनी महामानव डॉ.बाबासाहेबांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा देत आज कालच्या उच्चभू लोकांची मक्तेदारी असणाऱ्या अंबानीसारख्या शाळांचे वास्तव रुप प्रकट करीत जेव्हा कुटुंबातील माता आपल्या पाल्यांना फुले-आंबेडकरांच्या शिक्षणाचा मर्मबिंदू सांगतील तेव्हाच कुटुंबातून महामानव आकारास येतील असा आशावाद स्पष्ट केला. आजरोजी स्पर्धा परीक्षेतील महागड्या कोंचिग क्लासेसवाल्यांची दुकानदारी स्पष्ट करीत गरीब मुले कशी वंचित बनत आहेत, याबाबत खंत व्यक्त करीत राजकीय सत्ताधारी लोक ही मूत्र गिळून गप्प आहेत. याबाबत चिंता व्यक्त केली. यासाठी शिक्षणासारख्या क्षेत्रात फुले-आंबेडकरावादी शिक्षणतज्ञ येणे आवश्यक असल्याचे मत मांडले. इंग्रजी शाळांचे फुटलेले पेव कमी होण्यासाठी जिल्हा परिषदांच्या शाळांनी उचित, मार्मिक शिक्षण द्यावे. त्यातून मूलभूत शिक्षण मांडले जावे. प्रसिद्ध लेखक राजन गवस यांचा उल्लेख करीत भाषेचे खरे मारेकरी कोण हे सांगत आपल्या महाविद्यालयाने १४ एप्रिल २०१९ रोजी जगातील विज्ञानवादी संशोधक घडविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विज्ञान भवनाची मुहूर्तमेढ आज रोवत असल्याची घोषणा केली की जेणेकरुन फुले-आंबेडकरवादी विचारांचे वारसदार जगभर विज्ञानाचा प्रसार करतील, असा आशावाद स्पष्ट केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. के.बी. शेजूळ यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.